Enigma 2nd day coverage

Maharashtra times

28/8/16



# पोदारचा एनिग्मा 'हौस 'फुल!

अमेय मालशे, आदेश पुरंदरे, कॉलेज क्लब रिपोर्टर

'वर्ल्ड वॉर १, डेमोक्रॅटिक रिपब्लिक, जर्मनी' असे शब्द ऐकले की इतिहासातील युद्धांची आठवण होते ना? हीच इतिहासातील युद्धाची थीम घेऊन आलाय यंदाचा 'एनिग्मा २०१६'. माटुंग्याच्या आर. ए. पोदार कॉलेजमध्ये २६ ऑगस्टपासून एनिग्मा या इंटरकॉलेज फेस्टिवलला मोठ्या जल्लोषात सुरुवात झाली. 'एनिग्मा-दि अनफेअर वॉरफेअर' ही यंदाच्या एनिग्माची थीम आहे. महाराष्ट्र टाइम्स या फेस्टचा मीडिया पार्टनर आहे. २६ ते २८ ऑगस्टमध्ये होणाऱ्या या फेस्टमध्ये गेमिंग, स्पोर्ट्स, म्युझिक, लिटररी, ड्रामा, फाइन आर्टस् आणि डान्स अशा अनेक क्षेत्रातील एकूण ५० इव्हेंट्सचा यंदा समावेश आहे.

## चुरशीची लढाई!

'एनिग्मा २०१६'च्या दुसऱ्या दिवशी घेण्यात आलेल्या 'वॉर ऑफ सी एल्स' या स्पर्धेत कॉलेज लीडर्समध्ये चुरशीची लढाई रंगली. त्याचबरोबर दुसऱ्या दिवशी 'स्टाइल वॉर', 'स्वदेशी क्वीज', 'वॉर ऑफ डीजेज' इत्यादी इव्हेंट मोठ्या उत्साहात पार पडले. विशेष म्हणजे आतापर्यंतच्या स्पर्धा आणि इव्हेंट्समध्ये मुंबईतल्या अनेक नामांकित कॉलेजेसच्या टीम्सनी हजेरी लावली. डान्सगुरू गणेश आचार्य यांनी डान्सच्या इव्हेंटला उपस्थित राहून स्पर्धक व पोदारकरांचा उत्साह द्विगुणित केला.

दुसऱ्या दिवशी ऋतुरंगचा महावक्ता हा इव्हेंट पार पडला. त्यात परीक्षक म्हणून मराठी रेडिओ जॉकी गणेश अचवल उपस्थित होते. सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह आणि टीम एनिग्माचं उत्तम नियोजन यामुळेच यंदाचा एनिग्मा स्पेशल ठरणार असल्याचं बोलले जाते आहे. "कान्हा" चित्रपटाच्या टीमनेही सर्वांचा उत्साह वाढवण्यासाठी एनिग्माला भेट दिली. अवधूत गुप्ते यांनी त्यांच्या फॅन्ससाठी 'जबरा फॅन' हे गाणे गायले, तर वैभव तत्त्ववादी आणि गौरी नलावडे यांच्या डायलॉगबाजीने प्रेक्षकांवर गारुड घातले. दिवसाच्या शेवटी विद्यार्थी ईडीएम नाइटमध्ये 'डीजे जोशी'च्या तालावर देहभान विसरून नाचले.

महाराष्ट्र टाइम्स मीडिया पार्टनर